CMYK

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 211 ■ शुक्रवार, दि. 14 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

जिल्हा उद्योग केंद्रामार्फत एक दिवशीय कार्यशाळा संपन्न >>पान 2

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट >>पान 3

२२ मार्चपर्यंत सक्रीय क्षयरुग्ण शोध मोहिम >>पान 4

**सुविचार**

अत्तर सुगंधी व्हायला फुले सुगंधी असावी लागतात.




ब्लॉकबस्टर 'पुष्पा' ला टक्कर देणार डेव्हिट वॉर्नर, साऊथ मूव्हीमध्ये 'किसिक गर्ल' सोबत लावणार तडका

# जन्म प्रमाणपत्र बनवणे झाले आता कठीण, राज्य सरकारचे निर्देश

**दैनिक आपला विदर्भ**

मुंबई/प्रतिनिधी : राज्यात काही परकीय नागरिकांकडून विलंबाने जन्म नोंदी करून घेतल्या जात असल्याच्या तक्रारी सरकारच्या निदर्शनास आल्यानंतर अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी नियम २००० नुसार काही बदल करण्यात आलेत. आता एका वर्षापेक्षा जास्त विलंबाच्या जन्म आणि मृत्यू नोंदी घेण्याबाबतची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असून, जन्म आणि मृत्यू नोंदणीबाबत एक वर्षापेक्षा अधिक कालावधीत सूचना मिळाल्यास अशा प्रकरणात नोंद करण्यासाठी जिल्हा दंडाधिकारी किंवा उपविभागीय दंडाधिकारी किंवा कार्यकारी दंडाधिकारी यांनी ज्या ठिकाणी जन्म किंवा मृत्यू झालाय, त्याबाबतच्या अचूकतेची खात्री करून विलंब शुल्क आकारून अशा नोंदी करण्याची सुधारित तरतूद करण्यात आलीय, यासाठी राज्य सरकारने जन्म आणि मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ च्या कलम १३ मध्ये सुधारणा केली असून, शासन निर्णय जाहीर केलाय.

जन्म-मृत्यूची नोंद घेण्यास १ वर्षापेक्षा जास्त उशीर झालेल्या प्रकरणांमध्ये ज्यांची नोंद घ्यायची आहे, त्यांच्याकडून रुग्णालयाचे प्रमाणपत्र, आरोग्य विषयक नोंदीचे पुरावे, आई-वडील, रक्ताच्या नातेवाईकांचे अधिवास प्रमाणपत्र, जन्म प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड, पॅन कार्ड, अशा शासकीय ओळखपत्रांच्या पुराव्यांचा विचार करून तसेच अर्जदाराची वंशावळ आणि त्यांची ओळख पटवणारे शासकीय पुरावे आणि रहिवासाबाबतचे शासकीय दस्तऐवज यावरून सत्यता पटवूनच खात्री झाल्यानंतर जन्म मृत्यू नोंदीचे अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यात यावे, असे सक्त निर्देश देण्यात आलेत.

अर्जदार स्थानिक रहिवासी असल्याची पडताळणी करूनच निबंधकाने जन्म आणि मृत्यू नोंदीचे अनुपलब्धता प्रमाणपत्र द्यावे, अन्यथा स्थानिक रहिवासी नसेल तर जन्म-मृत्यू नोंदीची अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यात येऊ नये, यासाठी स्थानिक चौकशी अन् पंचनामा करून खात्री करावी, असे निर्देश देण्यात आलेत.

विलंबाने जन्म मृत्यू आणि नोंदीबाबत कारणमीमांसेसह पडताळणी करावी, एकाच कुटुंबातील अनेक सदस्य



एकाच वेळी नोंदीसाठी अर्ज करीत असतील तर अशा प्रकरणात अधिक सखोल चौकशी करावी. ज्या प्रकरणात सबळ पुरावे उपलब्ध होत नसतील, खोटे-बनावट पुरावे प्राप्त होत असतील तर तत्काळ अशा प्रकरणांची माहिती पोलिसांना देण्यात यावी. अर्जदाराकडून प्राप्त झालेला अर्ज आणि निबंधकाकडून प्राप्त प्रस्तावानुसार जिल्हा दंडाधिकारी आणि प्राधिकृत दंडाधिकारी यांनी १५ दिवसांचे जाहीर प्रगटन स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालयात, कार्यकारी दंडाधिकारी यांच्या कार्यालयात, संबंधित जन्म आणि मृत्यू निबंधक यांच्या कार्यालयात आणि स्थानिक वृत्तपत्रात अर्जदाराच्या खर्चाने प्रसिद्ध करावे.

अर्जदाराने जोडलेल्या कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी संबंधित कार्यालयाकडून त्याबाबतच्या पडताळणीचा लेखी अभिप्राय १५ दिवसांच्या आत मागवावेत. अर्जदाराच्या स्वयंघोषणापत्र, शपथपत्रावर दोन स्थानिक प्रतिष्ठित नागरिक, पोलीस पाटील, विशेष कार्यकारी अधिकारी, तंटामुक्ती अध्यक्ष, राजपत्रित अधिकारी यांची साक्षीदार म्हणून स्वाक्षरी घ्यावी. अर्जदाराच्या जन्माच्या वेळी त्याच्या कुटुंबातील रहिवासी व इतर सदस्यांच्या जन्माच्या पुराव्यांची माहिती घ्यावी, जन्म झाल्यापासून अर्जदार अर्ज करेपर्यंत कुठे वास्तव्याला होता, याचे पुरावे घ्यावेत. स्थानिक रहिवासाच्या ठिकाणी तलाठी-ग्रामसेवकामार्फत स्थानिक चौकशी करून वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागवावा.

अर्जदाराच्या जन्माच्या ठिकाणाच्या आणि रहिवासाचा तपास करून चौकशी अहवाल पोलीस विभागाकडून मागवण्यात यावा. महत्त्वाचे म्हणजे ज्या व्यक्तीची विलंबाने जन्म नोंद घ्यायची असेल त्या सज्ञान व्यक्तीनेच अर्ज करणे बंधनकारक आहे, असंही निर्णयात म्हटलेय.

## खडकपूर्णा धरणातून शेतीला पाणी मिळत नसल्याने
# युवा शेतकऱ्याने केली आत्महत्या

### चार पानाची सुसाईड नोट लिहून संपवले जीवन

**दैनिक आपला विदर्भ**




बुलढाणा/प्रतिनिधी : जिल्ह्यातील देऊळगाव राजा तालुक्यातील शिवनी आरमाळ येथील राज्य शासनाचा युवा पुरस्कार प्राप्त शेतकऱ्याने खडकपूर्णा धरणातून शेतीला पाणी मिळण्यासाठी वारंवार शासनाकडे मागणी केली. मात्र, शेतीला पाणी मिळत नसल्याने आर्थिक विवंचनेत असलेल्या कैलास नागरे या युवा शेतकऱ्याने विषारी औषध प्राशन करून आपले जीवन संपवले आहे. आत्महत्या पूर्वी त्यांनी लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये मुलासह कुटुंबाचे मुख्यमंत्र्यांनी पालकत्व स्वीकारावे, अशी याचना देखील सुसाईड नोटच्या माध्यमातून या शेतकऱ्याने केली आहे. शेतीला पाणी मिळण्यासाठी आत्महत्या करण्याची वेळ येत असेल तर, ही शोकांतिका आहे, अशा संतप्त प्रतिक्रिया समाजातून उमटत आहेत.

**राज्य शासनाचा युवा शेतकरी पुरस्कार प्राप्त शेतकरी कैलास नागरे यांनी खडकपूर्णा धरणातून शेतीला पाणी मिळावे, यासाठी आत्महत्या केली आहे. तर, युवा शेतकऱ्यांच्या आत्महत्या नंतर. जोपर्यंत शासनाकडून पाणी देण्यासंदर्भात आश्र्वासन मिळत नाही तोपर्यंत प्रेतावर अंतिम संस्कार करणार नसल्याचा पवित्रा कैलास नागरे यांच्या कुटुंबाने घेतला होता. पंचक्रोशीतील शेतकऱ्यांना बारमाही पाणी मिळावे, यासाठी कैलास नागरे यांनी सातत्याने आंदोलनाची भूमिका घेतली होती. डिसेंबर महिन्यात त्यांनी अन्नत्याग आंदोलन देखील केले होते. मात्र, त्यावेळी शासनाने दिलेला शब्द न पाळल्याने कैलास नागरे यांनी विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. दरम्यान, या घटनेनंतर समाजमन सुन्न झाले आहे. जनमानसातून सरकारबद्दल अत्यंत संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी देखील यावर उद्विग्न होत प्रतिक्रिया दिली आहे. कैलास नागरे यांची आत्महत्या नसून निर्ढावलेल्या शासनाने घेतलेला बळी असा आरोप त्यांनी केला आहे. त्यामुळे ज्या अधिकार्यांनी दिरंगाई केली त्यांच्या वर कारवाई करावी आणि त्यांच्या पत्नी ला शासकीय नोकरी व मुलांचे पालकत्व स्विकारावे अशी मागणी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी केली आहे.**



### शेतकरी कैलास नागरेंवर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार

देऊळगाव राजा तालुक्यातील शिवणी आरमाळ येथील राज्य सरकार चा युवा पुरस्कार प्राप्त शेतकरी कैलास नागरे यांनी आज आत्महत्या केल्याने शासन प्रशासनाचे वाभाडे निघाले आहे. पंचक्रोशीतील शेतकऱ्यांना खडकपूर्णा डाव्या कालव्यातून बारमाही पाणी मिळावे, यासाठी कैलास नागरे यांनी सातत्याने आंदोलनाची भूमिका घेतली होती. डिसेंबर महिन्यात त्यांनी अन्नत्याग आंदोलन देखील केले होते. मात्र, त्यावेळी शासनाने दिलेला शब्द न पाळल्याने कैलास नागरे यांनी विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. नागरे यांचे जळगाव माहिती ग्रामीण रुग्णालयात शव विच्छेदन केल्यानंतर त्यांच्या शेतात शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले आहे.

## जिल्ह्याचे पालकमंत्री कोण आहेत हे माहिती नाही

### काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची उपरोधिक टीका





**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी** : जिल्ह्याचे पालकमंत्री कोण आहेत. हेच माहीत नाहीत ते कधी दिसत नाहीत.कोणत्या सभा घेत नाहीत आढावा घेत नाही अशी उपरोधिक टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी माध्यमांशी बोलताना केली.

यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की,तरुणाने आत्महत्या करणे म्हणजे शोक संवेदना पेक्षा पलीकडचा विषय आहे. डाव्या कालव्याची मागणी अनेक दिवसांची आहे. त्याने केलेल्या आंदोलनाची फलश्रुती शून्य झाली आहे. या तरुणाच्या आत्महत्येने व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही, त्यामुळे त्यांनी कसे जगावे हे समजत नाही.माय जेऊ घालता नाही आणि बाप भीक मागू देत नाही, अशी परिस्थिती शेतकऱ्यांची आहे.या मुद्द्यावर न बोलता धार्मिक मुद्दे आणि जाती पातीचे राजकारण सुरू आहे. सरकार मध्ये आपसात टोळीयुद्ध सुरू आहे. अर्थसंकल्पात कुठल्याही ठोस घोषणा नाहीत. शेतकऱ्यांसाठी कुठलीही तरतूद नाही. सरकारने शेतकऱ्यांचे संदर्भात ठोस स्वरूपाची कारवाई करावी, या शेतकऱ्याच्या आत्महत्येला जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावे. जिल्ह्याचे पालकमंत्री कोण आहेत, हेच माहिती नाही.पालकमंत्री सांगा, दाखवा आणि हजार रुपये मिळवा, अशी परिस्थिती आहे. जिल्ह्याचा आढावा घेणे, टंचाई संदर्भात माहिती घेणे. मात्र, झेंडावंदना शिवाय काहीच दिसत नाहीत. जबाबदार अधिकारी लोकांवर कारवाई झाली पाहिजे, कैलासचे आंदोलन झाल्यावर डावा कालवा मंजूर झाला हे सांगणारा राजकीय वर्ग हा अधिकाऱ्यांच्या पेक्षा ही जास्त जबाबदार आहे. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याने चिठ्ठीत एक भावनिक साद घातली आहे.ती शासनाने पूर्ण करावी, मृत्यूनंतर कुटुंबांचे पालकत्व शासनाने स्वीकारावे.अपेक्षा शासनाने पुर्ण करावी, अशी मागणी प्रदेशाध्यक्ष काँग्रेस हर्षवर्धन सपकाळ यांनी सरकारकडे केली आहे.

# सरकारने शेतकऱ्याच्या तोंडाला पाने पुसली

## आमदार नाना पटोले यांचा पत्रकार परिषदेत आरोप

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** होळीच्या दिवशी आत्महत्या केली. ज्या शेतकऱ्याला सन्मानित केले गेले, असा शेतकरी सुसाईड नोटमध्ये सरकारवर दोष ठेवला आहे. सोमवारी हा मुद्दा आणि अधिवेशनात मांडू, हे सरकार शेतकरी विरोधी आहे. सरकारने शेतकऱ्याच्या तोंडाला पाने पुसली.महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्याचा आवाज आम्ही मांडू. असे मत काँग्रेस नेते नाना पटले यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

यावेळी ते म्हणाले की, राज्यपालांच्या अभिभाषणात सरकार आम्ही शेतकऱ्याला भरपूर दिले असे सांगतात. मात्र, यांनी काहीच दिले नाही.होळीच्या दिवशी शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे हे महाराष्ट्राला हादरवून टाकणारं आहे. परिणय फुके वरच्या सभागृहातील सदस्य, आमच्या सभागृहातील ते सदस्य नाहीत.विरोधी पक्षाकडून त्या विषयावर समाचार घेण्यासाठी आम्ही लावू, आमच्या सभागृहात असं होत नाही, त्या वरच्या सभागृहात असं असेल तर विरोधी पक्षाकडून समाचार घेऊ, मुख्यमंत्र्यांनी वाचाळ मंत्र्यांना थांबवले पाहिजे, राज्यातील धार्मिक भावना भडकवणाऱ्यांवर कारवाई केली गेली पाहिजे.

जयंत पाटील काय बोले मला माहिती नाही, सुधीर मुनगंटीवार सरकारला घरचा आहेर देताना आपण आपण पाहत आहोत. देवेंद्र फडणवीस यांचा सरकार शेतकऱ्यांना न्याय देण्यास असफल झाला असा त्याचा अर्थ होतो.आम्ही विधानसभेत स्थगनाचा प्रस्ताव मांडू आणि यावर सरकारने प्रामाणिकपणे उत्तर दिले पाहिजे. शिंदे व फडणवीस यांच्यातील वाद लपून राहिला नाही. शिंदेंच्या सगळ्या आमदारांचे सुरक्षा कवच काढण्यात आले आहे.



मात्र, भाजपच्या आमदाराचे सुरक्षा जशास तशी ठेवली आहे.आनंदाचा शिधा योजना एकनाथ शिंदे यांनी सुरू केली होती.परंतु ती बंद केली आहे. यावरून फडणवीस व शिंदे यांच्यातील वाद स्पष्ट झाला आहे. असे मत काँग्रेस नेते नाना पटोळे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

CMYK

## विनोद सम्राट दादा कोंडके

आज १४ मार्च, आपल्या इरसाल आणि गावरान भाषेतील विनोदाने महाराष्ट्राला खळखळून हसवणारे विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके यांचा स्मृतिदिन. जवळपास तीन दशकांहून अधिक काळ मराठी चित्रपट सृष्टीवर एकहाती अधिराज्य गाजवून मराठी सिनेमाला सुवर्णकाळ दाखवणाऱ्या विनोद सम्राट दादा कोंडके यांचा जन्म ८ ऑगस्ट १९३२ रोजी मुंबईतील नायगाव येथे झाला. त्यांचा जन्म झाला तो दिवस गोकुळ अष्टमीच्या होता, आपल्या पोटी बाळकृष्ण जन्माला आला म्हणून आई वडिलांनी त्यांचे नाव कृष्णा ठेवले. पण लहानपणापासूनच सर्व जन त्यांना दादा म्हणत पुढे त्यांचे नाव रूढ झाले. त्यांच्या मोठ्या बंधूचे निधन झाल्याने त्यांच्यावर घराची जबाबदारी पडली त्यामुळे दादा दरमहा साठ रुपये पगारावर सेवादलाच्या बँड पथकात काम करू लागले. लहानपणापासून दादांना कलेची आवड होती. सेवादलाच्या बँड पथकात त्यांच्या कला आणखी बहरून आल्या. फावल्या वेळात प्रसिद्ध गाण्यांचे विडंबन करणे, गाण्यांना चाली लावणे, विचित्र गाणी रचणे असे उद्योग दादा करू लागले. निळू फुले, राम नगरकर यासारखे जेष्ठ कलाकारही त्या काळात सेवादलात होते. तिथेच दादांची या महान कलाकारांशी मैत्री झाली आणि ही मैत्री पुढे आयुष्यभर टिकून राहिली. दादा सेवादलाच्या बँड पथकात काम करत असल्याने त्या काळात त्यांना बँड वाले दादा म्हणूनच लोक ओळखत असे. पुढे दादांनी स्वतःचा फड काढला. गावोगावी जाऊन दादा स्वतःची कला सादर करू लागले. वसंत सबनिसांच्या विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने दीडशे प्रयोग पूर्ण केले. त्या काळी हा विक्रम होता. या वगनाट्यामुळे दादा भलतेच लोकप्रिय झाले. गावागावांतील रसिक प्रेक्षक दादांना ओळखू लागले. याच वगनाट्यातील त्यांचे काम पाहून महान दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांनी त्यांना थेट चित्रपटात काम करण्याची संधी दिली. भालजी पेंढारकर यांनी त्यांना त्यांच्या तांबडी माती या चित्रपटात मुख्य भूमिका दिली. दादांनी या भूमिकेचे सोने केले. हा चित्रपट तिकीटबारीवर हिट झाला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. या चित्रपटानंतर दादांनी मागे वळून पाहिले नाही. मराठी चित्रपट सृष्टीत दादा कोंडके हे सर्वत्र नाव घुमू लागले. १९७१ साली दादा कोंडके यांनी दिग्दर्शित केलेला सोंगाड्या हा चित्रपट प्रदर्शित झाला मात्र मुंबईतील चित्रपटगृह चालकांनी आपल्या चित्रपटगृहात सोंगाड्या न लावता तीन देविया हा हिंदी चित्रपट लावला. आपल्या पहिल्याच चित्रपटाला चित्रपटगृह मिळत नसल्याचे पाहून दादा उद्विग्न झाले आणि त्यांनी थेट बाळासाहेब ठाकरेंची भेट घेतली मग काय बाळासाहेबांचा आदेश आणि शिवसैनिकांचा चित्रपटगृहात राडा. शिवसैनिकांनी चित्रपटगृहात घातलेल्या राड्याने आणि बाळासाहेबांच्या आदेशाने सोंगाड्या चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. नुसताच प्रदर्शित झाला नाही तर सुपर डूपर हिट झाला. सोंगाड्या पाहायला प्रेक्षकांच्या रांगा लागल्या. सोंगाड्या हा त्या काळातील सर्वाधिक हिट मराठी चित्रपट ठरला. सोंगाड्यामुळे मरगळलेल्या मराठी चित्रपट सृष्टीला ऊर्जितावस्था मिळाली. तमाशापटाला कंटाळलेल्या मराठी चित्रपट रसिकांना सोंगाड्यात दादांनी आपल्या विनोदाने मनमुराद हसवले. दादांच्या विनोदाला मराठी रसिकांनी मनमुराद दाद दिली. सोंगाड्याच्या अभूतपूर्व यशानंतर दादा कोंडके यांनी आणखी एका नव्या चित्रपटाची घोषणा केली या चित्रपटाचे नाव होते एकटा जीव सदाशिव. सोंगाड्यामुळे दादांची लोकप्रियता तुफान वाढली होती. या लोकप्रियतेचा धसका हिंदी चित्रपट सृष्टीनेही घेतला होता. दादांनी एकटा जीव सदाशिव या चित्रपटाची घोषणा केल्यावर राज कपूर यांनी त्यांच्या मुलासाठी म्हणजे ऋषी कपूर साठी काढलेला बॉबी या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली. सोंगाड्या पाठोपाठ एकटा जीव सदाशिव हा चित्रपटही सुपर हिट झाला. त्यानंतर दादांनी पांडू हवालदार या चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटात दादांनी अशोक सराफ यांना संधी दिली. हा चित्रपटही यशस्वी ठरला मग काय त्यानंतर दादांच्या यशस्वी चित्रपटांची मालिकाच सुरू झाली. तुमचं आमचं जमल, राम राम गंगाराम, बोट लावील तिथं गुदगुल्या, ह्योच नवरा पाहिजे, आली अंगावर, मुका घ्या मुका, पळवा पळवी, येऊ का घरात, सासरचे धोतर असे दादांचे सलग चित्रपट यशस्वी झाले. सलग नऊ रौप्य महोत्सवी चित्रपट देण्याचा विक्रम दादांनी केला. त्यांच्या या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली. त्यांच्या यशस्वी चित्रपटात त्यांच्या इरसाल विनोदाचा जितका वाटा होता तितकाच त्या चित्रपटातील श्रवणीय गाण्यांचा देखील होता. दादा कोंडके यांच्या चित्रपटातील सर्व गाणी गाजली. आजही दादांच्या चित्रपटातील गाणी तितकीच लोकप्रिय आहेत. दादांचे चित्रपट जितके लोकप्रिय झाले तितकेच ते वादग्रस्तही ठरले. त्यांच्या सर्वच चित्रपटांना सेन्सॉर बोर्डने आडकाठी आणली मात्र दादांनी सेन्सॉर बोर्डाच्या या दंडेली पुढे कधीही नमते घेतले नाही उलट सेन्सॉर बोर्डशी त्यांनी कायम दोन हात केले. ज्या शिवसेनेमुळे त्यांचे चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होऊ शकले त्या शिवसेनेशी त्यांनी कधीही प्रतारणा केली नाही. आयुष्यभर त्यांनी शिवसेनेशी बांधिलकी राखली. १४ मार्च १९९८ रोजी हृदय विकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. दादांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्र्वावर दुःखाचा डोंगर कोसळला. प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या विनोदाच्या या सम्राटाने अशी अकाली एक्झीट घेतल्याने प्रेक्षकांना मोठा धक्का बसला. त्यांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्र्वाला सुवर्णकाळ दाखवणारा विनोदाचा सम्राट काळाच्या पडद्याआड गेला. मराठी चित्रपट सृष्टीत त्यांच्यासारखा विनोद सम्राट पूर्वी झाला नाही आणि पुढेही होणार नाही. विनोद सम्राट दादा कोंडके यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# जिल्हा उद्योग केंद्रामार्फत एक दिवशीय कार्यशाळा संपन्न

## व्यवसाय, वित्त आणि शाश्वतता विषयावर मार्गदर्शन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या वाढीसाठी मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड एग्रीकल्चर पुणे तसेच जिल्हा उद्योग केंद्र यांचे संयुक्त विद्यमाने व्यवसाय, वित्त आणि शाश्र्वतता या विषयावर एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन येथील नर्मदा हॉलिडेजमध्ये करण्यात आले. यावेळी शासनाच्या विविध योजना, रोख प्रवाह व्यवस्थापन, पतशिस्त, हरित ऊर्जा व्यवसायातील कचरा नियंत्रण, शाश्र्वत वाढ, व्यवसायातील आर्थिक व्यवस्थापन आदी विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.





यावेळी जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे यांनी जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनेची माहिती दिली. व्यवस्थापक सुनिल पाटील यांनी मैत्री पोर्टल २.० वर सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच आर्थिक सल्लागार श्री.पेडणेकर यांनी रोख प्रवाह व्यवस्थापन, पतशिस्त, हरित ऊर्जा व्यवसायातील कचरा नियंत्रण, शाश्र्वत वाढ, व्यवसायातील आर्थिक व्यवस्थापन तसेच व्यवसाय वाढीसाठी करावयाचे उपाययोजनाबाबत मार्गदर्शन केले.

व्यवसायामध्ये वस्तू अथवा सेवा विकून नफा कमावल्या जातो. अशा पारंपारिक विचारसरणीच्या पुढे जाऊन, अजून जास्त नफा कसा कमवावा, याबाबत वित्तीय मार्गदर्शन, जीएसटी विषयक सल्ला, मार्केटिंग, ब्रॅण्डिंग, आयात-निर्यातीची माहिती अशा विविध विषयावर कार्यशाळेमध्ये तज्ज्ञांव्दारे मार्गदर्शन करण्यात आले. तसेच उपस्थितांव्दारे विचारण्यात आलेल्या प्रश्र्नाचे निराकरण करण्यात आले. या कार्यशाळेत जिह्यातील उद्यम नोंदणीकृत एमएसएमई उद्योजक, औद्योगीक संघटना पदाधिकारी, एफपीओ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुंबईत होळीच्या पूजेसाठी फुले आणायला गेलेल्या तिघांना शिवनेरी बसची धडक; एक ठार

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील कुर्ला येथे बेस्टच्या बसने पादचाऱ्यांना चिरडल्याची घटना तीन महिन्यांपूर्वी घडली होती. या अपघातात नऊ जणांचा मृत्यू झाला होता. आता महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एमएसआरटीसी) बसने मुंबईतील प्रभादेवी भागात तिघांना धडक दिली. या अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला असून दोन जण गंभीर जखमी आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार चालू आहेत. बुधवारी मध्यरात्री २.३० वाजता प्रभादेवी पुलावर ही घटना घडली.

प्रणय बोडके (२९), करण शिंदे (२९) आणि दुर्वेश गोरडे हे तिघे दुचाकीवरून दादरच्या फुल बाजराता फुले आणण्यासाठी जात होते. होळीच्या पूजेसाठी त्यांना फुलं हवी होती. त्याचवेळी प्रभादेवी पुलावर समोरून शिवनेरी बस चुकीच्या दिशेने भरधाव वेगात आली. या बसने प्रणयच्या दुचाकीला धडक दिली. त्यानंतर स्थानिकांनी या तिघांना केईएम रुग्णालयात नेलं. प्रणयचा रुग्णालयात उपचारांदरम्यान मृत्यू झाला. तर, दुर्वेश व करण गंभीर जखमी असून त्यांच्यावर ग्लोबल रुग्णालयात उपचार चालू आहेत.

## सैनिकी मुलांच्या वसतिगृहात भाडेतत्वावर भोजनकक्ष, उपहारगृहासाठी २५ मार्चपर्यंत अर्ज आमंत्रित

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या अधिनस्त सैनिकी मुलांचे वसतिगृह, चिखली रोड येथे कार्यरत असून त्यामध्ये माजी सैनिकांच्या उपचाराकरिता इसीएचएस कार्यान्वित आहे. इसीएचएसमध्ये दररोज १०० ते १५० माजी सैनिक विधवा तसेच त्यांचे अवलंबित उपचार व योजनेचा लाभ घेण्यासाठी येतात. या सैनिकी मुलांच्या वसगृिहाजवळ १ कि.मी. अंतराच्या आत अल्पोहाराकरीता कोणतेही उपहागृह उपलब्ध नसल्याने वसतिगृहातील भोजनकक्ष भाडेतत्वावर देण्यासाठी जिल्ह्यातील इच्छुक माजी सैनिक, माजी सैनिक महिला बचत गट, माजी सैनिक विधवा व इतर नागरीक यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहे. भोजनकक्ष भाडेत्वावर देण्यासाठी माजी सैनिक महिला बचत गट, माजी सैनिक, माजी सैनिक विधवा, इतर नागरीक याप्रमाणे प्राधान्य दिल्या जाईल. तरी इच्छूक अर्जदारांनी आपले अर्ज जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय बुलडाणा येथे दि. २५ मार्च २०२५ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

## मोताळा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील महिला प्रशिक्षणार्थींना टूलकिट वाटप

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मोताळा येथील सेवागिरी बाबा शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे नांदी फाउंडेशनमार्फत महिलांना विविध व्यवसायातील प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये उत्तीर्ण झालेल्या महिला प्रशिक्षणार्थींना नांदी फाउंडेशनव्दारे टूलकिट व प्रमाणपत्राचे वाटप दि. १२ मार्च रोजी करण्यात आले. यावेळी संस्थेचे प्राचार्य एस. डी. गंगावणे, नांदी फाउंडेशनचे प्रतिनिधी रजत वरादे व संस्थेतील सर्व कर्मचारी वृंद तथा प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

नांदी फाउंडेशनव्दारे कोपा, ड्रेसमेकिंग, संधाता, नळ कारागीर, जोडारी, तारतंत्री, आयसीटीएसएम, कॉस्मेटोलॉजी या विविध व्यवसायातील प्रशिक्षणार्थी(मुली) यांना व्यवसाय निहाय सैध्दांतिक व प्रात्यक्षिक तांत्रिक प्रशिक्षण देण्यात आले. तसेच संस्थेतील कॉस्मेटोलॉजी व्यवसायामध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या व प्रशिक्षण उत्तीर्ण केलेल्या आजीमाजी महिला प्रशिक्षणार्थीना ब्युटी फॉर बेटर लाइफ हे दहा दिवसाचे मोफत प्रशिक्षण दोन सत्रामध्ये देण्यात आले.

# संजय राऊत दोन दिवसा आधीच भाग घेऊन टाईट झाले

## खासदार नरेश म्हस्के यांची पत्रकार परिषद टीका

**दैनिक आपला विदर्भ**

**ठाणे/प्रतिनिधी :** संजय राऊत यांनी बहुतेक धुलिवंदनाच्या दिवशी भांग घ्याची असते. त्यांनी दोन दिवसाआधी अगोदरच भांग घेऊन टाइट झाले आहेत. अशी टीका खासदार नरेश मस्के यांनी संजय राऊत यांच्यावर पत्रकार परिषदेमध्ये केली. यावेळी खासदार नरेश मस्के म्हणाले की, संजय राऊत यांना काय माहिती डीजेची परमिशन आणि लाऊड स्पीकरची परमिशन कशाप्रकारे घेतात.माहित आहे का हा सुप्रीम कोर्टाचा निर्णय आहे. डीजे आणि आवाजावर बंदी घातली आहे. डेसिबलची जी काही अट आहे ते सुप्रीम कोर्टाचा निर्णय आहे. या सरकारने डीजेवर बंदी आणलेली नाही. तुमचे बॉस जेव्हा मुख्यमंत्री होते तेव्हा हाचं नियम होता, आता हा नियम आहे. कोरोना नंतर हे धुमधडाक्यात जे सण सुरू झालेत ते केवळ एकनाथ शिंदे यांनी निर्णय घेतला म्हणून तुमचे नेते सांगत होते मी आणि माझे कुटुंब घरात बसा, हात धुवा, बसं आता संपला विषय. अहो तुमची भांग उतरली नाही. हा सुप्रीम कोर्टाचा निर्णय आहे- वर्षानुवर्षे हा निर्णय आहे. काहीही झाले तर,



सरकारवर टीका करतात.संजय राऊत या सगळ्या प्रोसिजर जाणून घ्या. तुम्ही डायरेक्ट राज्यसभेवर गेलेले आहात.तुम्ही लोकल लेवलला काम नाही केले. या सगळ्या गोष्टी तुम्हाला माहित नाहीत. सकाळी उठल्या उठल्या भांगेची नशा उतरलेली नसते. उठ सूट सरकार... अहो होळी आहे. आता तर होळी आहे चुकीच्या पद्धतीने कोणाला फसवू नका, लोकांना माहित आहे सगळ्या गोष्टी जे काही चालू आहेत. उद्या त्यांच्याकडे वारसा असेल. ते मी बोलत नाहीत. ते तेव्हा पण ते सरकारवर टीका करणार का ? शाडूच्या मातीवर सुप्रीम कोर्टाने बंदी घातली आहे. तुम्ही असताना आपल्या पक्षप्रमुखांनी मीटिंग घेतल्या होत्या, मुख्यमंत्री असताना गणपतीत... शाडूच्या माती युज करा म्हणून महानगरपालिकेच्या मार्फत हा कोर्टाचा निर्णय आहे. सरकारने घेतलेला हा निर्णय नाही. चुकीच्या पद्धतीने बातमी पसरू नका.गंगा माता त्रिवेणी संगम याबद्दल लोकांच्या भावना आहे. आता धार्मिक गोष्टींवर टीका करू लागलेत.शिवसेना भाजपाचे सदस्य म्हणून लोकांनी काही डुबकी मारली नाही. एक हिंदू धर्माची परंपरा आहे. हे आपल्या पूर्वजांनी आपल्याला दिलेल्या आहे.संजय राऊत तुम्ही देव मानतात का ? संजय राऊत वैयक्तिक ते श्रीरामावरती पण टीका करतात. कायम तुम्ही हिंदुत्व हिंदुत्व म्हणतात ना... गंगामाता आणि त्रिवेणी संगम ला खूप महत्त्व आहे. देव आहे आपण मानतो पण देव आता तुम्हाला बघून घेईल. अशी टीका खासदार नरेश म्हस्के यांनी खासदार संजय राऊत यांच्यावर पत्रकार परिषदेत केली.

# धूलिवंदन सण विशेष

धूलिवंदन हा सण होळीच्या दुसऱ्या दिवशी साजरा केला जातो. यास धुळवड असेही म्हटले जाते. या दिवशी महाराष्ट्रात सार्वजनिक सुट्टी असते. हा सण फाल्गुन कृष्ण प्रतिपदेला साजरा करतात. परंपरेप्रमाणे या दिवशी होलीका दहनाची राख एकमेकांना लावतात.

कोकणात प्रत्येक गावाचे धूलिवंदन वेगवेगळ्या दिवशी असू शकते. या गावाचे धूलिवंदन सामान्यतः होळीच्या १५व्या दिवशी असते. फाल्गुन हा शालिवाहन शक महिन्यातील शेवटचा महिना आहे. त्यामुळे होळी हा हिंदू दिनदर्शिकेनुसार येणाऱ्या महिन्यातील शेवटचा सण असतो. होळी पेटवून दुसऱ्या दिवशी म्हणजे धुलीवंदनाच्या दिवशी जमिनीला, मातीला नमस्कार करण्याची प्रथा आहे. प्रत्येक प्राणी मात्राचा देह हा पंचमहाभूतांपासून बनलेला असतो. पृथ्वी, आप, त्वज, वायू, आकाश असा या पंचमहाभूतांचा क्रम आहे. पृथ्वी पासून सुरुवात आणि आकाशापर्यंत शेवट असे पंचक असणाऱ्या या तत्वांना आपल्या सणांच्या मधून आदर व्यक्त करण्याचा एक दिवस म्हणजे धूलिवंदन. यादिवशी पृथ्वीला वंदन केले जाते.



त्यानंतर १५ दिवसांनी नववर्षाची म्हणजे पाडव्याच्या दिवशी आकाशाला भिडणारी गुढी उभारण्याची पद्धत आहे.

या दिवशी सकाळी घरातील बायका पाण्याची तपेली, घागरी, हंडे पाण्याने भरुन होळी पेटवलेल्या जागी ठेवतात. सूर्याच्या उन्हाने हे पाणी तापते. या पाण्याने लहान मुलांना अंघोळ घालतात. असे मानले जाते की या पाण्याने अंघोळ केली असता लहान मुलांना किंवा कोणालाही उन्हाळा बाधत नाही. या दिवसात कै-याही मिळू लागतात. कै-या उकडून त्याचा गर लहान मुलांना अंगाला लावून स्नान घालतात. मोठी माणसे होळीवर पाणी शिंपडून ती राख कपाळाला लावतात. अंगाला फासतात व नंतर स्नान करतात.

काही ठिकाणी आजकाल लोकांनी आपापल्या सोयीनुसार होळीच्या दुस-या दिवशी रंगपंचमी साजरी करण्याची प्रथा सुरु केली आहे. त्यात लहान-मोठे, स्त्रिया-पुरुष सरसकट सगळे उत्साहाने रंग खेळतात. परंतु रंगपंचमी हा वेगळा सण आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### चाळीसगाव, भडगाव, अमळनेर आणि मुक्ताईनगर येथे चोरी करणाऱ्या आंतरराज्यस्तरीय टोळीचा पर्दाफाश



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर, चाळीसगाव, भडगाव आणि अमळनेर येथील चोरीच्या गुन्ह्यांची उकल करण्यात जळगाव स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. या चारही गुन्ह्यातील एकूण १६ लाख रुपयांचा ऐवज पोलिसांनी हस्तगत केला आहे. या प्रकरणातील संशयित आरोपी अद्याप मात्र फरार आहे. अशी माहिती पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी आज एका पत्रकार परिषदेत दिली.

### रायगडात होळीचा उत्साह शिगेला, पेझारीत पाटील कुटुंबियांकडून पारंपरिक पद्धतीने सामूहिक होळी पूजन



दैनिक आपला विदर्भ

**रायगड/प्रतिनिधी :** होळी आणि शिमगा सण हा कोकणातील अत्यंत लोकप्रिय व उत्साहवर्धक सण आहे. रायगड जिल्ह्यात सर्वत्रच अत्यंत उत्साही व धार्मिक वातावरणात एकोप्याने होळी सण साजरा केला जातोय. मागील अनेक वर्षांची परंपरा जतन करीत पेझारीत पाटील कुटुंबीयांनी चित्राताई पाटील यांच्या पुढाकाराने आज सामूहिक व पारंपरिक पद्धतीने होळी पूजन केले. दरवर्षीप्रमाणे पंचक्रोशीतील महिलांनी देखील या होळीचे मनोभावे पूजन केले. यावेळी पुरणपोळीचे नैवेद्य देऊन प्रसाद देण्यात आला. यावेळी झेप फाऊंडेशन च्या अध्यक्षा तथा जिल्हा परिषद माजी अर्थ व बांधकाम सभापती चित्राताई पाटील म्हणाल्या की मी कोकणातील असल्याने शिमगा सणाची ओढ कायम लागलेली असते. होळी, शिमगा कोकणातील अत्यंत महत्वाचा सण आहे. या सणात उत्साह व एकोपा टिकून राहतो, होळीच्या माध्यमातून आपली परंपरा व संस्कृती टिकवण्याचे काम केले जात असल्याचे चित्राताई पाटील म्हणाल्या. यावेळी पाटील कुटुंबियातील माजी आमदार पंडितशेठ पाटील, सौ. भावनाताई पाटील, ड. आस्वाद पाटील, चित्राताई पाटील व पंचक्रोशोतील महिला, युवती नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जिल्हा रुग्णालयात सोमवारी कान, नाक व घसा तज्ज्ञाद्वारे तपासणी; १८ वर्षाखालील बालकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत जिल्हा रुग्णालय बुलढाणा येथे छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. हेडगेवार रुग्णालयातील कान, नाक व घसा आणि कॉक्लीयर इम्प्लांट सर्जन व त्यांची टिम सोमवार दि. १७ मार्च २०२५ रोजी सकाळी १० ते २ या वेळेत डि.ई.आय.सी. विभागामध्ये तपासणीसाठी येणार आहे. त्याअनुषंगाने वयोगट ० ते १८ वर्षातील बालकांनी कान, नाक व घसा संदर्भातील तपासणीसाठी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी यांनी केले आहे.

### अवैधरित्या गोवंश कत्तल, बारा जण अटकेत

**रायगड/प्रतिनिधी :** रायगड जिल्ह्यातील खालापूर पोलीस ठाणे हद्दीतील हाळखुर्द अवैधरित्या गोवंश कत्तल केल्याचे दिसून आले. या प्रसंगी गोरक्षक आणि हाळखुर्द येथील ग्रामस्थ यांच्यात वाद झाला. तात्काळ पोलिसांनी बळाचा वापर करत जमावाला पांगवले. या घटनेत खालापूर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत बारा जणांना अटक केली असून, पुढील तपास खालापूर पोलीस करत आहेत. या घडलेल्या घटनेचा सकल हिंदू समाजाने खालापूर पोलीस ठाणे येथे काही काळ ठिय्या आंदोलन करत संबंधित यांचेवर कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी केली. या प्रकरमात अधिक तपास पोलिस करत आहेत.



# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट

## गडचिरोली माईनिंग हब, नागपूर विमानतळ, स्थानिक स्वराज्य संस्थांना वित्त आयोगाचा निधी इत्यादींबाबत सकारात्मक चर्चा

**नवी दिल्ली :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नवी दिल्ली येथे भेट घेत, त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केली.

राज्य सरकारने गडचिरोलीत पोलाद क्षेत्रात मोठा पुढाकार घेतला असून, गडचिरोली आता देशाची स्टीलसिटी म्हणून विकसित होत आहे. यादृष्टीने गडचिरोलीला माईनिंग हब म्हणून विकसित करण्यासाठी केंद्राने सहकार्य करावे, असे देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. नागपूर विमानतळाच्या कामाला सुद्धा गती देण्यात आली





असून, त्यात केंद्र सरकारसंदर्भातील काही विषयांबाबत सुद्धा देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी चर्चा केली. यामुळे विमानतळ कामातील अडसर आता लवकरच दूर होतील. स्थानिक स्वराज्य संस्थांना १५ व्या वित्त आयोगाचा निधी लवकरात लवकर मिळावा, असाही एक विषय या चर्चेत होता. या सर्व बाबतीत सकारात्मक प्रतिसाद पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला.

वर्ल्ड ऑडिओ, व्हीज्युअल अँड एन्टरटेंमेंट समिट आयोजित करण्याची संधी महाराष्ट्राला दिल्याबद्दल या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले. १ ते ४ मे या कालावधीत मुंबईत ही समिट होणार आहे. याचनिमित्ताने मुंबईत आयआयटीच्या धर्तीवर आयआयसीटी (इंडियन इन्स्टिट्युट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी) सुद्धा स्थापन करण्यात येणार असून, त्यासाठी सुद्धा केंद्र सरकार निधी देणार आहे, त्याबद्दलही मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले.

# जिल्हा युवा पुरस्कार: २१ मार्चपर्यंत अर्ज आमंत्रीत

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हास्तर युवा पुरस्कार सन २०२२-२३ व २०२३-२४ या वर्षाकरीता अर्ज मागविण्यात आले असून इच्छुकांनी दिनांक २१ मार्चपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. राज्याच्या युवा धोरण २०१२ नुसार जिल्हास्तरावर युवक आणि युवती तसेच संस्थेला पुरस्कार देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचलानालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत राज्याचे युवा धोरणानुसार जिल्ह्यातील युवांनी व संस्थांनी केलेल्या समाजहिताच्या कार्याचा गौरव व्हावा व युवा विकासाचे कार्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा युवा पुरस्कार प्रतीवर्षी देण्यात येत असतो. पुरस्कार जिल्ह्यातील एक युवक, एक युवती व एक नोंदणीकृत संस्था यांना देण्यात येतो. त्याअनुषंगाने मुल्यांकनासह व पात्रतेचे निकष पुर्ण करणाऱ्या जिल्ह्यातील युवक, युवती व संस्थांनी कार्यालयातुन अर्ज प्राप्त करुन आवश्यक कागदपत्र व शासन निर्णयानुसार प्रस्ताव सादर करावा. तसेच युवक - युवतीचे पोलीस चारित्र्य प्रमाणपत्र व संस्थेसाठी प्रस्ताव सादर करणाऱ्यांनी सर्व सदस्यांचे पोलीस चारित्र्य प्रमाणपत्रासह आपला परिपुर्ण प्रस्ताव दि. २१ मार्च२०२५ पर्यंत दोन प्रतीत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, जांभरुन रोड, बुलडाणा येथे सादर करावा. अधिक माहितीकरीता कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष कार्यालयात संपर्क साधावा, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस.महानकर यांनी कळविले आहे.

**युवक व युवतींसाठी पात्रतेचे निकष**

युवक किंवा युवतीचे वय पुरस्कार वर्षातील १ एप्रिल रोजी १३ वर्ष पुर्ण व ३१ मार्च रोजी ३५ वर्षापर्यंत असावे. (तसा पूरावा जोडावा), जिल्हा पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या अर्जदाराचे त्या जिल्ह्यात सलग पाच वर्ष वास्तव्य असावे. (दाखला जोडावा), पुरस्कार व्यक्ती अथवा संस्थेस विभागुन दिला जाणार नाही. पुरस्कार मरणोत्तर जाहीर करण्यात येणार नाही. केलेल्या कार्याचे सबळ पुरावे अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. (उदा. वृत्तपत्रीय कात्रणे, प्रशस्तीपत्रे, चित्रफिती व फोटो, इत्यादी), अर्जदार युवक व युवतीने पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर किमान दोन वर्ष क्रीयाशिल कार्यरत राहणार असल्याचे हमीपत्र देणे आवश्यक राहील. अर्जदार व्यक्तीचे कार्य हे स्वयंस्फुर्तीने केलेले असावे.(तसे हमीपत्र जोडावे), एका जिल्ह्यात पुरस्कार प्राप्त करणारी व्यक्ती राज्यातील अन्य जिल्ह्यात जिल्हा युवा पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र राहणार नाही. केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय व निमशासकीय कार्यालयातील अधिकारी किंवा कर्मचारी तसेच विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी पुरस्कारासाठी पात्र राहणार नाही. अर्जदाराने पोलीस विभागाने प्रमाणीत केलेला चारित्र्य दाखला देणे आवश्यक राहील.

**संस्थांसाठी पात्रता निकष**

पुरस्कार संस्थेस विभागुन दिला जाणार नाही. संस्थांनी केलेल्या कार्याचे सबळ पुरावे अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. (उदा. वृत्तपत्र कात्रणे, प्रशस्तीपत्रे, चित्रफिती व फोटो, इत्यादी), अर्जदार संस्थेने पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर किमान दोन वर्ष क्रीयाशिल कार्यरत राहणार असल्याचे हमीपत्र देणे आवश्यक राहील. अर्जदार संस्था सार्वजनिक विश्र्वस्त अधिनियम १८६० किंवा मुंबई पब्लीक ट्रस्ट क्ट १९५० नुसार पंजीबध्द असावी. अर्जदार संस्था नोंदणी झाल्यानंतर किमान पाच वर्ष कार्यरत असणे आवश्यक आहे. अर्जदार संस्थेचे कार्य हे स्वयंस्फुर्तीने केलेले असावे.(तसे हमीपत्र जोडावे), एका जिल्ह्यात पुरस्कार प्राप्त करणारी संस्था राज्यातील अन्य जिल्ह्यात जिल्हा युवा पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र राहणार नाही. (तसे हमीपत्र जोडावे), अर्जदार व संस्थेच्या सदस्यांचा पोलीस विभागाने प्रमाणीत केलेला चारित्र्य दाखला (संबंधीत परिक्षेत्रातील पोलीस स्टेशन) देणे आवश्यक राहील.

**पुरस्कारासाठी मुल्यांकन**

युवा व युवा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांनी केलेले कार्य दि.१ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीत गत तीन वर्षाची केलेली कार्य कामगिरी विचारात घेण्यात येईल. युवा अथवा नोंदणीकृत संस्थांनी ग्रामीण व शहरी भागात केलेले सामाजिक कार्य, राज्यात साधन संपती जतन व संवर्धन तसेच राष्ट्र उभारणीच्या विकासासाठी सहाय्यभूत ठरणारे कार्य, समाजातील दुर्बल घटक, अनुसुचित जाती, जमाती व जनजाती आदिवासी भाग, इ. बाबतचे कार्य. शिक्षण, प्रौढ, शिक्षण, रोजगार, आरोग्य, पर्यावरण, सांस्कृतीक, कला, क्रीडा, मनोरंजन, विज्ञान तंत्रज्ञान, व्यवसाय, महिला सक्षमीकरण, स्त्रीभ्रुन, व्यसनमुक्ती तसेच युवांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले कार्य. तसेच राष्ट्रीय एकात्मतेस प्रोत्साहन देणारे कार्य, नागरी गलीच्छ वस्ती सुधारणा, झोपडपट्टी, आपत्ती व्यवस्थापन तसेच स्थानिक समस्या, महिला सक्षमीकरण अशा बाबीचा मुल्यांकनासाठी विचार केल्या जाईल.

### साई पल्लवीचा जबरदस्त डान्स! भावाच्या लग्नात टिपिकल साऊथ म्युझिकवर धरला ठेका



**मुंबई/प्रतिनिधी :** साऊथची प्रसिद्ध अभिनेत्री साई पल्लवी नेहमीच तिच्या साधेपणासाठी ओळखली जाते. पण नुकतीच ती तिच्या चुलत भावाच्या लग्नात धमाकेदार डान्स करताना दिसली. 'तांडेल' चित्रपटातील अभिनेत्रीचा हा डान्सिंग व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. तिच्या चाहत्यांना तिचा हा अंदाज प्रचंड आवडला असून, नेटिझन्सनी कमेंटचा वर्षाव केला आहे.

बहिणीसोबत केला धमाल डान्स

साई पल्लवीचा हा व्हिडिओ तिच्या चुलत भावाच्या लग्नातील आहे. या व्हिडिओमध्ये ती तिची बहीण पूजा कन्नन आणि कुटुंबासह जल्लोषात डान्स करताना दिसत आहे. निळ्या रंगाच्या साडीत साई अतिशय सुंदर दिसत आहे. तिच्या या डान्स व्हिडिओवर चाहते भरभरून प्रेम दर्शवत आहेत. अनेकांनी तिच्या डान्सला 'माइंड ब्लोइंग' असे म्हटले आहे.

सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल

साईचा हा डान्स व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. तिचे चाहते हा व्हिडिओ मोठ्या प्रमाणात शेअर करत आहेत. एका यूजरने 'माइंड ब्लोइंग', तर दुसऱ्याने 'तळलश ारींशिीं' अशी कमेंट केली आहे. अनेकांनी हार्ट आणि फायर इमोजी पाठवत साईवर प्रेम उधळले आहे.

'रामायण' मध्ये झळकणार साई?

कामाच्या आघाडीवर साई शेवटची नागा चैतन्यसोबत 'तांडेल' चित्रपटात दिसली होती. हा चित्रपट ७ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित झाला होता. थिएटरनंतर आता हा चित्रपट नेटफ्लिक्सवर पाहता येतोय. मीडिया रिपोर्ट्सनुसार, साई लवकरच नितीश तिवारी यांच्या 'रामायण' या चित्रपटात झळकणार आहे.

# महिनाभरात संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठेल, याला सत्ताधारी नेतेच जबाबदार असतील - आमदार जितेंद्र आव्हाड

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** नितेश राणेंना आता कोणीतरी इतिहासाचे धडे शिकवायला हवेत.त्यांना महाराष्ट्र पेटवायचाच आहे. अनेक ठिकाणी दंगल झाली. महिन्याभरात संपूर्ण महाराष्ट्र पेटलेला दिसेल याला कारणीभूत फक्त सत्ताधारी आणि सत्ताधाऱ्यांमध्ये काही निवडक नेते असतील असा आरोप आमदार जितेंद्र आव्हाड यांनी माध्यमांशी बोलताना केला.

शिंदे शिवसेना महापालिका जनसंवाद हे फसवा फसवीचे उद्योग बंद करा, ३०-४० वर्ष सत्ता तुमच्या हातात आहे आणि कसले जनसंवाद आणि जनता दरबार घेता.लोकांच्या समस्याच तुम्हाला सोडवायच्या नाहीत, पाणी आहे का ठाणे शहरात, कचरा उचलला जातोय का? या छोट्या छोट्या समस्या तर सोडवा, या शहराला पाणीच नाहीये पाणी तर द्या, या शहरात अनधिकृत बांधकाम वाढायला लागलेत ते थांबवण्याचा प्रयत्न करा, यासाठी कशाला जनता दरबार हवाय.एक मोठा स्फोट मी करणार आहे, एका नवीन अधिकाऱ्याची नेमणूक झाली आहे, या अधिकाऱ्याने कुठल्या कुठल्या विभागातून पैसा मिळतो हे तपासायला लोक पाठवली आहेत. यासाठी कौसा आणि शिळ भागात गँगवॉर झाला, वसुलीवरून दोन गँग एकमेकांवर भिडल्या हे अधिकाऱ्यांना शोभत का सत्ताधारी शिवसेनेने याचे उत्तर द्यावे, ठाणे महापालिकेची अधोगती कुठल्या दिशेने आणि किती गतीने सुरू आहे हे बघून आश्र्चर्य वाटते. कोणाचं कोणावर बंधन, लाज, शरम यात राहिलेली नाही, अनधिकृत बांधकाम केली तर त्याच्यावर कारवाई करा, असा कायदा असताना ठाणे महानगरपालिकेचे अधिकारीच अनधिकृत बांधकाम करतात. कोणाच्यातरी एखादी कानाखाली खेचावी लागेल तर अधिकारी सरळ होतील. अधिकारी पैसे वसुलीसाठी गँगवॉर करत आहेत, यांना सांगा मुंबईच्या गँगला आमंत्रित करा, तुमच्या वसुलीसाठी तसा पण तुमचा पगार कमीच पडतोय तुम्हाला, छोट्या छोट्या गँग का वापरता, तुमचा कॉन्टॅक्ट नसेल तर मी कॉन्टॅक्ट करून देतो, चांगल्या मोठ्या गँगवाल्यांशी कॉन्टॅक्ट करून देतो म्हणजे ते व्यवस्थित वसुली करून देतील.महापालिका आयुक्त यांना विनंती आहे की, सहन करू नका. शेवटी डाग तुमच्याच अंगावर येईल.जयंत पाटील काही अस्वस्थ नाहीत, तिथे भाषण कशासाठी सुरू होत आहे. तुम्हाला माहित नाही, तिथे शक्तिपीठाच भाषण चालू होते. तेव्हा ते म्हणाले माझ्याकडून काही




अपेक्षा ठेवू नका, कारण लोकच पैसे जास्त मिळाल्यावर फिरतात. त्यामुळे आमचे काही खरे नाही, तुम्ही फिरलात तर आम्ही काय करणार यावरून ते भाषण आहे.

नितेश राणेंना आता कोणीतरी इतिहासाचे धडे शिकवायला हवेत. आता आपण किती वेळा त्यांना समजायचे त्यांना समजूनच घ्यायचे नाही.त्यांना महाराष्ट्र पेटवायचाच आहे. आगच लावायची आहे.

राजापूरला दंगल झाली अनेक ठिकाणी दंगल झाली. महिन्याभरात संपूर्ण महाराष्ट्र पेटलेला दिसेल याला कारणीभूत फक्त सत्ताधारी आणि सत्ताधाऱ्यांमध्ये काही निवडक नेते असतील असा आरोप आमदार जितेंद्र आव्हाड यांनी माध्यमांशी बोलताना केला.

# २२ मार्चपर्यंत सक्रीय क्षयरुग्ण शोध मोहिम

## मोहिमेस नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा क्षयरोग केंद्राच्यावतीने दि. १० ते २२ मार्च या कालावधीत शहरातील झोपडपट्टी, विटभट्टी, भटक्याजमाती, स्थलांतरीत कामगार, बेघर कामगार, वृध्दाश्रम, आश्रमशाळा व वस्तीगृह अशा अतिजोखमीच्या भागाचे ३ लाख १ हजार ५३३ लोकसंख्येमध्ये सर्वेक्षण करुण सक्रिय क्षयरुग्ण शोधमोहिम राबविण्यात येणार आहे. क्षयरुग्ण शोध मोहिम यशस्वी करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वर्षा गुट्टे यांनी केले आहे.

मोहिमेत आशा स्वयंसेविका आणि आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन घरातील सर्व सदस्यांची क्षयरोगासंदभातील तपासणी करणार आहे. यासाठी जिल्ह्यात १२१ पथकांची स्थापना करण्यात आली आहे. तसेच २४ सुपरवाईझर व २४२ आशावर्कर व कर्मचाऱ्यांव्दारे सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

मोहिमेचे उद्दिष्ट्य क्षयरोगाचे निदानपासून अद्यापही वंचित असणाऱ्या सर्व क्षयरुग्णांचा शोध घेऊन त्यांना औषधोपचारावर आणणे आहे. मोहिमेमध्ये जोखमीच्या क्षेत्र व ठिकाणी गृहभेट देऊन क्षयरोगाची लक्षणे असणाऱ्या व्यक्तींना शोधणे, त्यांची थुंकी नमुने तपासणी, एक्स-रे व आवश्यकते प्रमाणे इतर तपासण्या करुन क्षयरोगाचे निदान करणे आणि औषधोपचार सुरु करणे अपेक्षित आहे. यासाठी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमातील कर्मचारी, त्यांचे भागधारक, अशासकीय संस्था तसेच सार्वजनिक आरोग्य सेवेतील कर्मचारी यांचे पथके निवडलेल्या भागात घरोघरी संशयित क्षयरुग्णांचे सर्वेक्षण करणार आहे.

यामध्ये जिल्हातील वंचित घटक झोपडपट्टी, दुर्गम भाग, वस्त्या, कारागृहातील कैदी, ज्या गावात रुग्ण जास्त असू शकतात असे गावे, एचआयव्ही अतिजोखीम गट, असंघटित कामगार, बांधकाम स्थळाच्या ठिकाणी काम करणारे कामगार, बेघर वृध्दाश्रम अशा निवडलेल्या भागांमध्ये सार्वजनिक आरोग्य सेवेतील कर्मचारी, आशावर्कर, अंगणवाडी सेविका तसेच नर्सिंग कॉलेजचे विद्यार्थी आणि इतर स्वयंसेवक हे गृहभेटीव्दारे संशयित क्षयरुग्णांचे सर्वेक्षण करणार आहे. गृहभेटी दरम्यान पथक सदस्य निश्चित केलेल्या सर्व घरांना भेटी देऊन घरात असलेल्या सर्व व्यक्तींची क्षयरोग लक्षणांविषयी माहिती घेणार असून क्षयरोगाची लक्षणे असणाऱ्या व्यक्तीची थुंकी नमुना गोळा करुन तपासणी करिता जवळच्या प्रयोगशाळा पाठविणार आहे.



**क्षयरोगाची लक्षणे :** दोन आठवडे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीचा खोकला असणे, दोन आठवड्यापेक्षा जास्त मुदतीचा ताप, मागील तीन महिन्यामध्ये वजनात लक्षणीय घट, थुंकीवाटे रक्त पडणे, छातीत दुखणे व मानेवारील गाठ.

सदर लक्षणे असल्यास व्यक्तीने तपासणी करुन घेणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील शासकीय आरोग्य संस्थांमध्ये मोफत थुंकी नमुना तपासणी, क्ष-किरण तपासणी तसेच डॉक्टरांच्या सल्यानुसार सीबीनॅट मशीनव्दारे तपासणी व्यवस्था उपलब्ध आहे. क्षयरोग विरोधातल्या लढ्यामध्ये सर्वांनी एकत्र येण्याची आवश्यकता असून अद्याप निदान न झालेल्या क्षयरुग्णांचा शोध घेऊन त्यांचेवर उपचार करण्यात येणार आहे. ग्रामीण भागासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते तसेच शहरी भागासाठी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी यांच्या मार्गदर्शनाखली सदर मोहिम राबविण्यात येत आहे. तरी क्षयरुग्ण शोध मोहिमेस सर्वानी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# बेरोजगार उमेदवारांसाठी प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना; ३१ मार्चपर्यंत अर्ज आमंत्रित

दैनिक आपला विदर्भ



**बुलढाणा/प्रतिनिधी :** सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींसाठी केंद्र शासनाच्यावतीने प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना सुरू केली आहे. योजनंतर्गत तरुणांना मोठ्या कंपन्यांमध्ये इंटर्नशिपची संधी दिली जाणार असून दुसऱ्या फेरीसाठी पुन्हा अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. इच्छुक उमेदवारांनी दि. ३१ मार्चपर्यंत अर्ज नोंदणी करुन योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त ग. प्र. बिटोडे यांनी केले आहे.

जिल्ह्यातील पात्र उमेदवारांनी http://pminternship.mca.gov.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन आपली नोंदणी करावी. उमेदवारांना १२ महिन्यांसाठी इंटर्नशिप मिळणार असून दरमहा ५ हजार रुपये मिळणार आहेत. याशिवाय इंटर्नशिप पूर्ण झाल्यानंतर ६ हजार रुपये एक रक्कमी अनुदान दिले जाईल. या योजनेंतर्गत भारत सरकारकडून प्रत्येक प्रशिक्षणार्थीला प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेंतर्गत विमा संरक्षण दिले जाणार आहे.

# विभागीय हातमाग कापड स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागामार्फत हातमाग विणकरांनी विणलेल्या उत्कृष्ठ हातमाग कापड नमुन्यांना प्रोत्साहन देऊन विणकरांना गौरविण्यासाठी हातमाग कापड स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यानुसार विभागीय हातमाग कापड स्पर्धा नागपुरच्या विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या अध्यक्षतेखाली दि. २० मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता घेण्यात येणार आहे.



अमरावती आणि नागपुर विभागातील सर्व जिल्ह्यातील हातमाग विणकरांनी जास्तीत जास्त संख्येने या स्पर्धेत सहभाग नोंदविण्याकरीता हातमाग विणकरांनी तयार केलेले नमुने प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर या कार्यालयात दिनांक १८ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजतापर्यंत सादर करणे आवश्यक आहे. विणकरांनी आपले नमूने प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग, नागपुर प्रशासकीय इमारत क्रमाक २, आठवा माळा, बि विंग, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे पाठवावेत. अधिक माहितीसाठी प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग यांच्याशी किंवा ०७१२-२५३७९२७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन वस्त्रोद्योग प्रादेशिक उपआयुक्त तथा विभागीय हातमाग कापड स्पर्धा सदस्य सचिव सीमा पांडे यांनी केले आहे.

# अमरावती विमानतळाला मिळाला डीजीसीआयकडून एरोड्रम परवाना; अमरावतीवरुन उड्डाणाचा मार्ग मोकळा

**अमरावती/प्रतिनिधी :** अमरावती विमानतळाला हवाई उड्डाणासाठी आवश्यक असलेला परवाना डीजीसीएकडून प्राप्त झाला आहे. त्यामुळे आता अमरावती विमानतळावरुन हवाई उड्डाणाचा मार्ग मोकळा झाला आहे. अलायन्स एअरचे अमरावती-मुंबई-अमरावती असे विमान त्यामुळे या महिनाअखेरीस पासून धावणार आहे.

डीजीसीएचे हे प्रमाणपत्र प्रातिनिधीक स्वरुपात एमएडीसीच्या एमडी स्वाती पांडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सोपविले.



# विना परवाना शस्त्र बाळगणाऱ्या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल





दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** उमरखेड शहरातील राज डिलक्स या हॉटेल व लॉज मधून विना परवाना (तलवार, चाकु) बाळगणाऱ्या तीन आरोपीस घेतले ताब्यात

८ मार्च रोजी उमरखेड शहरातील राज डिलक्स या हॉटेल व लॉज मध्ये तीन इसम हे अवैध तलवार व चाकू बाळगुण आहे . अशी गोपनीय माहिती उमरखेड पोलिसांना मिळाली.माहितीवरून पोलीस अधिक्षक यांच्या अवैध तलवार व चाकु विरुध्द कारवाई करणे संबंधाने दिलेल्या निर्देशानुसार उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड,सा. व पोनि शंकर पांचाळ, यांच्या मार्गदर्शनात दि.०८/०३/२०२५ रोजी सपोनि पांडुरंग शिंदे डिटेक्शन बेंच प्रमुख पोलीस उपनिरीक्षक सागर इंगळे सोबत पो शि १६५२ संघशिल टेंभरे डी बी पथक यांनी राज डिलक्स या हॉटेल व लॉज येथून तीन आरोपीस विना परवाना (तलवार, चाकु) बाळगल्या प्रकरणी तलवार, बिलाल खान सलीम खान दोन्ही रा. अशोक नगर यवतमाळ व चाकू जप्त करून आरोपीना अटक केली. आरोपी शेख अहेफज शेख फिरोज, बिलाल खान सलीम खान दोन्ही रा. अशोक नगर यवतमाळ व सैयद मुदसिर सैयद मजिद रा.झाकीर हुसेनबार्ड उमरखेड,यांचे विरुध्द शस्त्र अधिनीयम १९५९ कलम ४/२५ सह कलम २२३ भा.न्या.स. अन्वये अप क्र. १४३/२०२५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोहेको २०२० संदिप ठाकुर करोत

# जलतारा योजना पाणीटंचाईवर प्रभावी उपाय

## दहा आठवड्यात दहा लक्ष जणतारा उभारण्याचे निर्धार : जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस

दैनिक आपला विदर्भ



**वाशिम/प्रतिनिधी :** वाशिम जिल्ह्यातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी जलतारा योजना प्रभावी ठरत आहे. या योजनेंतर्गत जिल्ह्यात पुढील १० आठवड्यात १० लाख जलतारा तयार करण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. आणि उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांनी मौजे जनुना सोनवळ (ता. वाशिम) येथे भेट देऊन ग्रामस्थांना योजनेची माहिती दिली. त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून जलतारा उपक्रमाचे महत्त्व समजावून सांगितले. तसेच अग्रीस्टॅक योजनेतही सर्वांनी फार्मर आयडीची नोंदणी करून घेण्याबाबत आवाहन करण्यात आले.यावेळी जलतारा खोदणीच्या उपक्रमाचा शुभारंभ पूजन व श्रमदान करून करण्यात आला.

जलतारा योजनेंमुळे भूजल पातळी वाढून पाण्याची टिकाऊ उपलब्धता राहणार आहे. शेतीसाठी सिंचनाची सुविधा उपलब्ध होईल, पावसाचे पाणी साठवता येईल आणि पाणीटंचाईच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाय होणार आहे.

याप्रसंगी तहसीलदार वाशीम निलेश पळसकर, तालुका कृषी अधिकारी अतुल जावळे, ग्राम महसूल अधिकारी श्री गावंडे श्री सडके महसूल मंडळ अधिकारी पांडुरंग मापारी, कृषी सहाय्यक, ग्रामपंचायत अधिकारी आणि पाणी फाउंडेशनचे अध्यक्ष सुभाष नानवटे पोलीस पाटील संतोष चौधरी उपस्थित होते.विशेष म्हणजे या कार्यक्रमाचे आयोजन या गावाचे रहिवासी असलेले प्रशासनातील ग्राम महसूल अधिकारी व्ही जी राठोड तसेच गावकरी मंडळी यांनी स्वयंफुर्तीने यांनी केले होते यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य सुभाष राठोड माजी पंचायत समिती सदस्य प्रेमसिंग राठोड यांचे विशेष सहकार्य लाभले.

प्रशासनाच्या आवाहनानुसार, शेतकऱ्यांनी या उपक्रमात सहभाग घेऊन जलतारा खोदणीसाठी पुढाकार घ्यावा, जेणेकरून भविष्यात पाण्याची समस्या निर्माण होणार नाही.

## विविध वृत्त...

### लाखो नारळाची होळी करुन सैलानी यात्रेला सुरुवात




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील पिंपळगाव सराई गावात सैलानी यात्रेला सुरुवात झाली आहे. दहा दिवसीय या उत्सवाची सुरुवात लाखो नारळाची होळी पेटवून केली जात असते. राज्यभरातूनच नव्हे राज्याच्या बाहेरून देखील भाविक मोठ्या संख्येत सैलानी यात्रेत सहभागी झाले आहेत.यंदा या सैलानी यात्रेचं ११८ व वर्ष आहे. सैलानी बाबाच्या या उत्सवा दरम्यान असंख्य मनोरुग्ण येथे येत असतात. या ठिकाणी पेटवण्यात आलेल्या होळीमध्ये अनेक मनोरुग्ण आणि व्याधीग्रस्तांना नारळ, लिंबू आणि काळी बाहुली ओवाळून टाकल्याने त्यांच्या व्याधी मुक्त होतात अशी मान्यता केल्या अनेक वर्षापासून जोपासली जात आहे. सैलानी यात्रेत सहभागी होणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेता तालुका प्रशासनाकडून देखील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी ठिकठिकाणी पोलिसांची कुमक तैनात करून ठेवण्यात आली आहे. शिवाय सीसीटीव्ही कॅमेरा च्या माध्यमातून सैलानी उत्सवातील प्रत्येक हालचालींवर लक्ष ठेवल्या जात आहे.

### भटक्या कुत्र्याचा चिमुकल्यावर हल्ल्याची वणी येथील घटना सीसीटीव्हीत कैद




दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :** वणी शहरातील सदाशिव नगर येथे भटक्या कुत्र्यानी एका लहान मुलावर प्राणघातक हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेचा अंगावर काटा आणणारा सीसीटीव्ही व्हिडिओ समोर आला असून, मुलगा जसं तसं कुत्र्याच्या तावडीतून सुटून पळून गेल्याने त्याचा जीव वाचला. तर त्याच वेळी गल्लीत सायकल चालवत असलेला दुसरा मुलगा कुत्र्यानी हल्ला करताच सायकल सोडून पळून जाताना दिसत आहे. ही सर्व घटना अनिल उत्तरवार यांच्या घरातील सीसीटीव्ही मध्ये कैद झाली आहे. नगर पालिका क्षेत्रात भटक्या कुत्र्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन प्रशासनाने ठोस पावले उचलण्याची मागणी केली जात आहे.

### कैलास बोराडे या तरुणावर क्रूर हल्ला करणाऱ्या गुन्हेगारांवर कडक कारवाई करा, जय मल्हार संघटनेची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील अनवा गावात गावगुंडांनी कैलास बोराडे या तरुणावर २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीचे दिवशी लोखंडी रॉड गरम करून अत्यंत क्रूरपणे अंगाला चटके देऊन जीवघेणा हल्ला केला.या घटनेच्या निषेधार्थ जय मल्हार संघटना ढाणकीच्या वतीने बिटरगाव पोलीस स्टेशन मार्फत जिल्हाअधीक्षक कार्यालय यवतमाळ,तसेच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना गुन्हेगारांवर कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी केली.



या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरून निघाला असून समाजात सर्वत्र भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ही घटना केवळ एका व्यक्तीला उद्देशून नसून ती संपूर्ण समाजाला धक्का देणारी घटना आहे. अशा प्रकारच्या घटनेला आळा घालण्यासाठी सरकारने कडक उपाययोजना करून कैलास बोराडे या तरुणाला अत्यंत निर्दयीपणे मारहाण करणाऱ्या गुन्हेगारांवर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी .अशी मागणी जय मल्हार संघटना ढाणकी तथा सकल धनगर समाज बांधव यांच्या वतीने करण्यात आली. यावेळी माजी कृषी उत्पन्न बाजार समिती बाळासाहेब चंद्रे पाटील, भास्कर पाटील चंद्रे ढाणकी राष्ट्रवादी शहराध्यक्ष, के .डी. हुलकाने माजी सरपंच कृष्णापुर, दिगंबर शिरडकर, साहेबराव वाघमोडे, गजानन चंद्रे, अक्षय बिट्टेवाड, खंडेराव लकडे, लक्ष्मण शिरडकर, इत्यादीनी निवेदनाद्वारे मागणी केली.